# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०७/०९/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर :—** दिनांक १२/०१/२०२२ चे १४:०० वा. ते दिनांक २८/०२/२०२२ चे २०.०० वा. चे सुमारास आरोपी नामे— साहील भिमराव नेवारे, वय १८ वर्ष, रा. पंढरी जलालखेडा ता. सावनेर हा सध्या त्याचे मामाचे घरी राहत असून याने वय १३ वर्षीय पीडित/फिर्यादी अल्पवयीन मुलगी हिच्या अल्पवयाचा फयदा घेउन आरोपी क्र. २. वर्षा अमित भोंडवे, वय ३० वर्ष, रा. पानउबाळी, ता कळमेश्वर जि. नागपूर हिने पीडितेस बोलावून तिचेसामोर आरोपी साहील याने पीडितेशी माहे जानेवारी २०२२ मध्ये एके दिवशी दुपारी ०२.०० वा. तसेच फेब्रूवारी २०२२ मध्ये दोन वेळा शारीरिक संबंध केले. आरोपी क्र.२ हिने त्यास मदत केली त्यावर दोघांनिही पीडितेला कोणालाही न सांगण्याची धमकी दिली परिणामी पीडित ही गर्भवती राहीली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२)(जे), ३७६(३),३४,५०६ भादंवि. सहकलम ४,(जे),(२),५(एल),५(यु),६,९(ग),१०,१६,१७ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सोनाली रासकर मो. क्र. ९०८२१९६०८० या करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा :—** दिनांक ०१/०५/२०२२ चे दिनांक २५/०८/२०२२ सुमारास वय १९ वर्षीय पीडित/फिर्यादी हिची ओळख मोबाईल वरून आरोपी नामे— दिपक नरेश गोडबोले, रा. शेरडी तह. सावनेर याचेशी झाली व मैत्री झाली. त्यानंतर प्रेमसंबंध सुरू झाले आरोपीने फिर्यादीस लग्नासाठी विचारले होते एप्रिल २०२२ मध्ये लग्न करू असे म्हणत होता. याबाबत दोघाच्यांही कुटुंबीयांना माहीती होती. आरोपीने फिर्यादीस माहे मे २०२२ मध्ये सावनेर नागपूर रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपा समोरिल एका लॉजवर नेवुन जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमीष दाखवुन वेळोवेळी शारीरिक संबध प्रस्थापीत केले. आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमीष दाखवुन आपला फोन बंद करून राहते ठिकाणावरून सर्व सामान घेवुन पळुन गेला. त्यावरून फिर्यादीने आरोपीचे मोबाईलवर संपर्क करण्याचा बरेच वेळा प्रयत्न करूनही आरोपीचा फोन बंद येत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ४१७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अजय मानकर मो. क्र. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**